# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL

ESTD: 1969

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXI | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, NOVEMBER 2018 | NO. 1


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**स्तोत्र १६:१-८**

१) हे देवा, माझे रक्षण कर, कारण मी तुझा आश्रय धरिला आहे.

२) मी परमेश्वराला म्हटले, तूच माझा प्रभु आहेस, तुजपरते मला सुख नाही.

३) पृथ्वीवरील पवित्र जन हेच श्रेष्ठ होत, त्यांच्या ठायी माझा सर्व आनंद आहे.

४) जे परमेश्वराला सोडून अन्य देवाच्या भक्तिस लागतात त्यांना बहुत दु:खे होतील. ते रक्तमय पेयार्पणे अर्पितात तशी मी अर्पिणार नाही, मी त्यांच्या देवांचे नांव घेणार नाही.

५) परमेश्वर माझ्या वतनाचा व प्यालाचा वांटा आहे. माझा वाटा संभाळणारा तूच आहेस.

६) मजसाठी मापनसूत्रे रमणीय स्थानी पडली आहेत, माझे वतन माझ्या मनाजोगे आहे.

७) परमेश्वराने मला बोध केला आहे, त्याचा मी धन्यवाद करितो, माझे अंतर्यामहि मला रात्री उपदेश करिते.

८) मी आपल्यापुढे परमेश्वराला नित्य ठेविले आहे, तो माझ्या उजवीकडे आहे, म्हणून मी ढळणार नाही.

PEOPLE UNDER DELUSION !

## संभ्रमात/फसवणूकी खाली असलेले लोक

- पास्टर एस.सॅम सेल्वा राज

**"बंधुजनहो, आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचे आगमन व त्याच्या जवळ आपले एकत्र होणे यासंबंधाने आम्ही तुम्हांस अशी विनंती करतो की, तुम्ही एकाएकी दचकून चित्तस्थैर्य सोडू नका व घाबरू नका, प्रभुचा दिवस येऊन ठेपला आहे असे सांगणाऱ्या आत्म्याने किंवा जणू काय आम्हांकडून आलेल्या वचनाने अगर पत्राने घाबरु नका.**

**कोणत्याही प्रकारे कोणाकडून फसू नका, त्या दिवसाच्या अगोदर धर्मत्याग होऊन पापपुरुष प्रकट होईल". (२ थेस्सल २:१-३)**

काही ईश्वरविज्ञानी लोकांचा असा विश्वास आहे की, पौल या वचनात "प्रभूचा दिवस" हा शेवटला न्यायाचा दिवस अशा अर्थाने वापरत आहे. मी इतर अनेक विद्वानांच्या मताशी सहमत आहे की पौल "प्रभुचा दिवस" हा त्याच्या दुसऱ्या येण्याचा दिवस या अर्थाने वापरत आहे. आणि पौल असे स्पष्ट करतो की येशूचे दुसरे आगमन हे दोन गोष्टी घडल्या शिवाय होणार नाही.

१. मोठ्या प्रमाणात धर्मत्याग होईल. अनेक जण ज्यांनी देवाला ओळखले होते, ते सुवार्तेच्या सत्यापासून दूर जातील.

२. पापपुरुष किंवा ख्रिस्तविरोधी हा "प्रकट" होईल.

ख्रिस्तावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला हे स्पष्ट कळले पाहिजे कि "धर्मत्यागाला" सुरुवात झालेली आहे. आजचे पुष्कळसे विश्वासीजन आणि मागील काही दशकांतील ख्रिस्तीजन यांची देवाविषयीची प्रीति थंडावली आहे. हा विचार मनात ठेवून मला पौलांच्या दुसऱ्या मुद्यावर लक्ष केंद्रीत करावयाचे आहे, तो म्हणजे **"पापपुरुष प्रकट होत नाही तो पर्यंत प्रभू येशू येणार नाही - त्याचे आगमन होणार नाही".**

या वाक्याने पौलाला काय म्हणावयाचे आहे? पौल असे म्हणत आहे की, प्रभु येशू जो पर्यंत ख्रिस्त विरोधी जगाचा अधिकारी म्हणून राजासनावर स्थानापन्न होणार नाही, आणि त्याची ओळख आपल्याला होणार नाही तो पर्यंत पुन:परतुन येणार नाही. मला नाही असे वाटत. पौलाला हे ठाऊक होते की ख्रिस्त कोणत्याही क्षणी येऊ शकेल. प्रभु येशू देखील असे म्हणतो, अनपेक्षितपणे त्याचे येणे होणार. डोळ्यांची पापणी

*(पान ३ वर .....)*

❖ ❖ ❖ **२०१९ - सुवर्ण महोत्सवी वर्ष** ❖ ❖ ❖

१९६९ पासून शिक्षणाद्वारे जिवांना स्पर्श करणारे

# त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी

मासिक प्रकाशन - इंग्रजी,तमीळ,मल्यालम,तेलगु,हिन्दी,मराठी,कन्नड,बंगाली,गुजराती,उरीया,नेपाली,आसामी,पंजाबी,उर्दु सिंहाला आणि अफ्रिकन



**"कारण दिवस समीप आला आहे, परमेश्वराचा दिवस येऊन ठेपला आहे, तो अभ्रमय दिवस आहे, तो विधर्म्यांचा शासनदिन आहे"** (यहेज्केल ३०:३)

ख्रिस्तामधील प्रियांनो,

जगाचा तारणारा, जो येशू ख्रिस्त त्याच्या अतुल्य नामात तुम्हां सर्वांना आमच्या प्रेमळ शुभेच्छा.

आम्हाला ठाऊक आहे की तुमच्यापैकी पुष्कळ जण आतुरतेने या मासिकाची अपेक्षा करीत असता. आम्हाला हे देखील ठाऊक आहे की या मासिकाद्वारे तुम्हांला संपूर्ण महिन्याकरिता आत्मिक मान्ना मिळतो. आम्हांला इंग्रजी, तामीळ, तेलगू, हिन्दी, कन्नड, मराठी, आसामी, बंगाली, उर्दु, गुजराथी, नेपाली, उडीया, पंजाबी, सिंहाली आणि आफ्रिकन भाषा बोलणाऱ्या लोकांकडून फोनद्वारे, एस.एम.एस. संदेशांद्वारे आणि ई-मेल व पत्रांद्वारे कळविण्यात येते की त्यांना या मासिकाद्वारे आशीर्वाद प्राप्त होत आहेत. यावरुन आम्हाला कळते की हे मासिक सर्व लोकांकरिता उपयुक्त होत आहे. यामुळेच आम्ही जरी दिवस आणि रात्र परिश्रम घेत असलो, आर्थिक आजार, कर्मचाऱ्यांची कमतरता आणि सामाजिक व राजकीय प्रतिकुल परिस्थिती या समस्यांचा सामना करावा लागत असला तरी आम्ही निराश होत नाही.

देवाची लेकरे त्याच्या सेवाकार्यामध्ये सहभागी होत नाहीत किंवा रस घेत नाहीत, तर जगीक जाहिरातीत, जगीक सुख आणि आनंद, कौटुंबिक समारंभ यात सहभागी होत आहेत, त्यासाठी कार्य करीत आहेत हे पासून आम्हाला फार दु:ख होत आहे. तरी देखील मागील ५० वर्षांमध्ये आम्ही विश्रांती न घेता जे परिश्रम करीत आलो त्याची फळे आम्ही पाहू शकत आहोत. हल्लीच्या काळातील नियम आणि कायदे आम्हाला लोकांसमोर सत्य प्रकट करण्यासाठी अडखळण ठरत असले तरी देखील आम्ही प्रभु परमेश्वराची वाणी ऐकण्यात आणि त्यांची इच्छा पूर्ण करण्यात कधीही बेजबाबदारी दर्शविली नाही किंवा दुर्लक्ष्य केले नाही.

जगातील अनेक राष्ट्रांनी आपल्या पवित्र शास्त्राला मान्य नसणाऱ्या जीवनशैलींना मान्यता देऊन प्रत्यक्षात कृति करण्यास सुरुवात देखील केली आहे. बायबल समलिंगी शारिरीक संबंध देवासमोर तिरस्कारनिय आहे असे स्पष्ट सांगत असताना, ज्या संबंधाविषयी जाहीरपणे चर्चा करु शकत नाही. त्यांना अनेक राष्ट्रांनी स्विकारले आहे, त्यात आपला भारत देश देखील आहे. विवाहबाह्य लैंगिक संबंध हा गुन्हा नाही अशा प्रकारचा जो निवाडा दिला गेला त्यामुळे भारतातील देवाच्या लेकरांना अतिशय दु:ख होत आहे.

**हल्लीचे पाळक आणि मंडळ्या या विषयांवर चर्चा करण्यास वाव देत नाही.** परंतु त्याकडे कानाडोळा करुन त्यांना महत्व देत नाहीत ही चांगली गोष्ट आहे. या संबंधात देवाच्या लेकरांमध्ये याविषयी चर्चा करुन तिची जाहिरात करु नये. आजच्या परिस्थितीत देवाच्या लेकरांचे हे कर्तव्य आहे. देव या घटनांमध्ये बदल घडविल. चोरी करणे शिका आणि विसरुन जा. तामिळ भाषेत एक अशा अर्थाची म्हण आहे. परंतु १ करिंथ २:२ या वचनात आपणास वाचावयास मिळते की, **"येशू ख्रिस्त म्हणजे वध:स्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त याशिवाय तुम्हांमध्ये दुसरे काही जमेस धरु नये असा मी निश्चय केला"** आणि १ करिंथ १०:१-१२ या वचनांत आपण वाचतो, "बंधुजनहो, आपले पूर्वज सर्वच मेघाखाली होते आणि समुद्रांतून ते सर्व पार गेले, याविषयी तुम्ही अजाण असावे अशी माझी इच्छा नाही. मेघ व समुद्र यांच्याद्वारे मोशामध्ये त्या सर्वांचा बाप्तिस्मा झाला. सर्वांनी एकच आध्यात्मिक अन्न खाल्ले आणि सर्व एकच आध्यात्मिक पाणी प्याले, कारण ते आपल्यामागे चालणाऱ्या




**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.
**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager
**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.
Bro. J. R. Jayabalan
**ADVISORY BOARD**
Bro. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Dr. D. Dhaya Devadas
Bro. Jose Abraham
Bro. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Bro. Thomas T. Jacob, B.Com., B.L.
**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+91-44) 2852 8282
2852 9293, 2854 7766
Email : sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
Websites :
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners Village English High School Crusades 24 Hour Prayer Ministry Community Development

आध्यात्मिक खडकांतून पीत होते, तो खडक तर ख्रिस्त होता. तरी त्यांतील बहुतेक लोकांविषयी देव संतुष्ट नव्हता. ह्यामुळे "त्यांचा रानात नाश झाला" ह्या गोष्टी आपल्याला दाखले अशा झाल्या यासाठी की त्यांनी "लोभ धरिला" तसे आपण वाईट गोष्टींचे "लोभी होऊ नये". त्यांच्या पैकी कित्येक मूर्तिपूजक होते तसे होऊ नका, लोक खावयाला-प्यावयाला बसले, नंतर खेळावयास उठले, असे शास्त्रांत लिहिले आहे. त्यापैकी कित्येकांनी जारकर्म केले. त्याप्रमाणे आपण जारकर्म करु नये, ते एका दिवसांत तेवीस हजार मरून पडले. त्यापैकी कित्येकांनी प्रभूची परिक्षा केली आणि ते सापांच्या योगे नाश पावले, त्याप्रमाणे आपण प्रभूची परिक्षा करु नये. त्यापैकी कित्येकांनी कुरकुर केली, आणि ते संहारकर्त्याकडून नाश पावले, त्याप्रमाणे तुम्ही कुरुकुर करु नका. या गोष्टी दाखल्याच्या रुपाने त्यांस घडल्या आणि ज्या आपल्यावर युगांचा शेवट आला आहे. त्या आपल्या बोधासाठी त्या लिहिल्या आहेत. यास्तव आपण उभे आहोत असे ज्यांस वाटते त्याने पडू नये म्हणून सांभाळावे".

इफिस ५:३-८ या वचनात देखील आपण वाचतो, "जारकर्म, सर्व प्रकारची अशुध्दता व लोभ **यांचा तुम्हांमध्ये उच्चारहि न होवो,** हे पवित्र जनांस शोभते. तसेच अमंगळपण, बाष्कळ गोष्टी व टवाळी ह्यांचाही न होवो, ती उचित नाहीत, तर त्यांऐवजी ईशोपकार स्मरण होवो. जारकर्मी, अशुध्द कृति करणारा किंवा लोभी (हा मूर्तीपूजक आहे) असल्या कोणासही ख्रिस्ताच्या व देवाच्या राज्यांत वारसा नाही हे तुम्ही जाणूनच आहा. पोकळ भाषणाने कोणी तुम्हांस फसवू नये, कारण अशा पापांमुळे आज्ञाभंग करणाऱ्या पुत्रांवर देवाचा कोप होतो. यास्तव तुम्ही त्यांचे भागीदार होऊ नका, कारण जे तुम्ही पूर्वी अंधकार असे होता ते तुम्ही आता प्रभूमध्ये प्रकाश असे आहा, प्रकाशाच्या प्रजेसारिखे चाला".

बायबल जसे सांगते की, संपूर्ण जग हे वासनेच्या आणि सैतानाच्या अधिपत्याखाली आले आहे. जसे लेकरे ज्यांना उजवा आणि डावा हात कोणता हे कळत नाही तसेच शहाणे आणि सुशिक्षित देखील अग्नीच्या सरोवरात जातात.

**देवाच्या लोकांचे अंत:करणपूर्वक समर्पण हाच एकमेव मार्ग आहे.**

संपूर्ण जगाची मोठ्या धोक्यातून सुटका करण्याचे सोडून किंवा त्या कडे दुर्लक्ष्य करुन, आजकालच्या मंडळ्या या स्वत:चेच साम्राज्य प्रस्थापित करण्यावर लक्ष केंद्रित करीत आहेत. आजच्या मंडळ्या उत्तुंग इमारती उभारण्यात, शक्य होईल तितके अधिक धन गोळा करण्याच्या आणि दुसऱ्या मंडळ्यांतील विश्वासणाऱ्यांना आपल्या मंडळीत खेचण्याचा प्रयत्न करण्याचा उद्देश बाळगून आहेत. मंडळ्यांमध्ये गो गोष्टिंना केवळ महत्वच दिले जात नाही, तर इतर मंडळ्यांतून आपल्या मंडळीत विश्वासणाऱ्यांना अशा जगीक पध्दतीने कसे आणावे याविषयी प्रशिक्षण दिले जाते आणि योजना आखण्यात येतात. हे वेदनादायक दृष्य आहे, नाही का ? मंडळीच लोकांना सहभागीतेत आणू शकते. देवाच्या प्रत्येक लेकराने पश्चाताप करावा आणि शुभवर्तमान प्रसारासाठी पुढे यावे.

यिर्मया ५:३०-३१ म्हटले आहे, "चकित करणारे अघोर कृत्य देशात घडले आहे. संदेष्टे खोटे संदेश देतात, त्यांच्या धोरणाने याजक अधिकार चालवितात व माझ्या लोकांसही असेच आवडते, पण अखेरीस तुम्ही काय करणार ?"

"कारण लहानथोर सर्व स्वहिताला हपापलेले आहेत, संदेष्टयांपासून याजकांपर्यंत सगळे कपटाचा व्यवहार करितात. शांतीचे नांव नसता शांति शांति असे म्हणून माझ्या लोकांचा घाव ते वरवर बरा करितात."

"परमेश्वर म्हणतो, चव्हाट्यावर उभे राहून पाहा आणि पुरातन मार्गापैकी कोणता म्हणून विचारा, सन्मार्गाने चाला, अशाने तुमच्या जीवास विश्रांती मिळेल, पण ते म्हणाले, आम्ही चालणार नाही." (यिर्मया ६:१३,१४,१६).

देवाच्या प्रिय लेकरांनो, देवाच्या न्यायाचा दिवस लवकरच येणार आहे. तो थरकांप उडविणारा असणार ! त्यासाठी तुम्ही स्वत:स तयार करा ! सावध असा ! फसविले जाऊ नका. जगाला सुवार्ता गाजविणे आणि आपल्या देशांतील प्रत्येकांनी **येशू ख्रिस्ताच्या** नामाची उपासना करावी हेच एक आपले ओझे असू द्या.

**हे प्रभु शुभवर्तमान गाजविणे हेच माझे ओझे असे दे !**
**माझ्या देशांत तुझे नाम गाजविले जावो !!**
**हेच आपल्या अंत:करणात ओझे असावे**
**एकच जीवन**
**ते वेगाने सरत जावे**
**देवासाठी तुम्ही जे करिता**
**तेच केवळ शेवटपर्यंत टिकून राहाणार !**

तुमच्या प्रतिक्रिया अपेक्षित आहोत. आम्ही तुम्हाकरिता प्रार्थना करीत आहोत. कृपया तुम्ही देखील आम्हाकरिता प्रार्थना करा.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचा दास
**एस. सॅम सेल्वा राज.**

---

*(पान १ वरुन .....)*

उघडझाप होते तितक्या म्हणजे क्षणात त्याचे येणे होईल.

मला वाटते पौलाच्या "प्रकट" या शब्दत गुढ अर्थ सापडतो. या ग्रीक शब्दाचा अर्थ "आच्छादान काढणे" असा आहे. माझा असा विश्वास आहे, की पौल असे म्हणत आहे की, "जो पर्यंत ख्रिस्त विरोधकाची संपूर्ण योजना आणि कार्यक्रम प्रकट होत नाही, आणि मंडळ्यांना ते कळत नाही." अर्थात ख्रिस्तविरोधकाची योजना देव वचनामध्ये स्पष्ट पणे - उघड करण्यात आलेली आहे. पौल जाहीर करतो, "अधर्माचे गुज आतांच आपले कार्य चालवित आहे". (२ थेस्सल २:७) त्याचे असे म्हणणे आहे गुढ अवस्थेतील पाप आज देखील कार्यरत आहे, ते शेवटी ख्रिस्त विरोधकात दिसून येईल, हरवलेल्या मानव जातीवर दुष्टाईचा आत्मा येईल आणि लोकांच्या मनाची इतकी घट्ट पकड घेईल की पापपुरुष लवकर अधिकारावर येईल.

या वाक्याला "अन्यायाचे रहस्य/गुढ" (mystery of iniquity) असा दुसरा देखील अर्थ आहे. त्या मूळ इब्री भाषेतील "silent initiation" "स्तब्ध किंवा मूक प्रवेश" अशा शब्दातून येतो. पौल येथे ख्रिस्त विरोधकाच्या गुप्त प्रवेशामुळे समजण्यास कठीण असे दुष्ट परिणाम त्याच्या दिवसात तो पहात होता त्या विषयी बोलत आहे.

आता या घडीला हाच गुढ - रहस्यमय

आत्मा मोहविण्याच्या पूर्ण सामर्थ्यानिशी लोकांच्या मोठ्या समुदायाला पापपुरुषाला स्विकारण्यासाठी तयार करीत आहे. हजारो लोकांना त्याच्या कळपात सामील करुन घेण्यास त्यांच्या विचारांत संथपणे आणि गुप्तपणे परिवर्तन करीत आहे आणि हे इतक्या जलद गतीने आणि प्रभावी रितीने घडत आहे, की पापपुरुषाचे आगमन नजीकच्या भविष्यात होऊ शकते.

प्रभु येशूच्या दुसऱ्या येण्याच्या अगोदर ख्रिस्त विरोधकाच्या शारिरीक प्रकटीकरण पहाण्याची आवश्यकता नाही. त्याच्या दुष्ट आत्म्यांनी अगोदरच अनेक भुलविल्या गेलेल्या विश्वासण्यांत प्रवेश केला आहे.

**पौल "अधर्माच्या गुजाचे" पूर्ण स्पष्टिकरण देत आहे.**

पौल म्हणतो ते गुज - रहस्य हे असे आहे: सैतान मोठ्या समुदायाला भुलवून बेकायदेशीर पणाच्या प्रवृत्तिकडे भुलविणार. अधर्मासाठी पौल या परिच्छेदात जो ग्रीक शब्द वापरत आहे त्याचा अर्थ प्रत्यक्षात "बेकायदेशीपणा" असा आहे. त्यामुळे असंख्य लोक कायदा नसल्यासारखे किंरा बंधन नसल्या सारखे वागणार आहेत.

असे जरी असले, तरी हा बेकायदेशीरपणा मनुष्यांच्या नियमाच्या किंवा नागरी अधिकाराच्या विरुध्द बंडखोरी नाही, किंवा चोरी करणे, बलात्कार किंवा खून करणे नाही. या गोष्टींनी देव क्रोधीत होतो. परंतु बेकायदेशीर पणाचे रहस्य अधिकच गहन - खोल आहे. ते सरळ सरळ ख्रिस्तामध्ये असलेले सत्य नाकारणे - देवाचा पवित्र शब्द आणि आज्ञा न पाळणे किंवा बाजूला ठेवणे आहे. ते पवित्र वचनांच्या विरुध्द बंड करणे आहे.

हा बेकायदेशीर पणाचा आत्मा आपल्या देशात वाढत आहे. आपल्या समाजातून हद्दपार करण्यासाठी कायदे करण्याच्या मागे असणारी ही शक्ती आहे. सैतानाने हवेला फसविण्यासाठी याच आत्म्याचा उपयोग केला. त्याने अनेक शब्द वापरले, "देव तुला आज्ञा मोडल्याबद्दल शिक्षा करणार नाही. तू फळ सेवन करुन तुझी इच्छा पूर्ण करु शकते. तुला त्याबद्दल किंमत मोजावी लागणार नाही".

ती नरकापासून केलेली लबाडी होती आणि सैतान आज ख्रिस्तीजनांमध्ये बेकायदेशीरपणाचे रहस्य - गुज पुढे आणण्याकरिता त्याच लबाडीचा उपयोग करीत आहे. तो दररोज विश्वासणाऱ्यांच्या समुदायाला ते त्याच्या पापात राहिले तरी त्याबद्दल कोणतीही शिक्षा होणार नाही अशा प्रकारे समजावीत आहे खात्री पटवून देत आहे. ती ख्रिस्ताच्या कृपेच्या शुभवर्तमानाला अडखळण करुन ते व्यभिचारी - स्वैराचारी संदेशात बदलण्याची सैतानी योजना आहे.

शोकांन्तीका ही आहे, अनेक आत्मिक कोमट अवस्थेत असलेले ख्रिस्तीजन या बेकायदेशीर पणाच्या आत्म्याला वश होत आहेत. काही जन तर ख्रिस्त विरोधकाच्या शिक्षणात सामील झाले आहेत. ख्रिस्त विरोधी, प्रकट होऊन, चमत्कार करणे आणि समस्यांचो निराकरण करण्यास सुरुवात करील, त्याचा स्विकार करण्यास ते परिपक्व झालेले आहेत - तयार आहेत.

तुम्ही कदाचीत असा विचार कराल, "मी

*(पान ६ वर .....)*


## ECHO OF HIS CALL

**Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.**

**Annual Subscription : Rs. 100/-     Life Subscription : Rs. 2000/-**

The multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offerings and donations of the God's children like you. You may support **Echo of His Call** and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new addresses.

**Echo of His Call** is available in 16 languages in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get blessed.

Your letters, prayer requests and your financial helps (by D.D., Cheque, M.O. etc.) to **ECHO OF HIS CALL** may be sent to the address below.

Please send your **Land Phone / Cell Phone Numbers and E.mail addresses** for updation.

## ECHO OF HIS CALL

**10, MOHAMMED ABDULLAH 2nd STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA**

**PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,**
**Cell: (+91) 98410 71852, 90924 62566**
**E-mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in**
**Websites: www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com**
**YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO**

**The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.**

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार

# प्रार्थना विनंत्या

## १९ नोव्हेंबर २०१८ ते १८ डिसेंबर २०१८

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## देव कार्यरत आहे !

### स्तुति करीता मुद्दे

**१९ नोव्हेंबर** : देव आमच्या रुग्णालय सेवेत चमत्कार घडवितो.

**२० नोव्हेंबर** : आमच्या मुख्य मंडळीत आणि शाखा मंडळ्यांमध्ये पुष्कळसे नवीन आत्मे सामील झाले आहेत.

**२१ नोव्हेंबर** : प्रभु परमेश्वराने आम्हांस २०१९ सालासाठी एको ऑफ हिज कॉलचे कॅलेंडर (दिनदर्शिका) छापण्यास सहाय्य केले.

**२२ नोव्हेंबर** : **नहेम्या बायबल कॉलेजच्या** सर्व व्याख्यात्यांकरिता देवाची स्तुती करुया.

**२३ नोव्हेंबर** : आमच्या मुख्य प्रार्थना मंदिरात पांच भाषांमध्ये होत असलेल्या सात उपासना देव आशीर्वादीत करीत आहे.

**२४ नोव्हेंबर** : आमच्या मुद्रणालयात एकूण १६ भाषांमध्ये छापून मिशन क्षेत्रांमध्ये पाठविण्यात आलेले शुभवर्तमान साहित्य देवाने आशीर्वादीत केले आहे.

**२५ नोव्हेंबर** : सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन शाळेच्या प्रिन्सिपॉल, शिक्षक आणि इतर सर्व स्टाफ बद्दल देवाची स्तुती करु या.

**२६ नोव्हेंबर** : आमच्या **एको ऑफ हिज कॉलच्या** १६ भाषेतील सर्व वाचकां करिता देवाची स्तुती करु या.

**२७ नोव्हेंबर** : आमच्या सर्व मंडळ्यांतील वडीलांकरिता देवाची स्तुती करु या.

**२८ नोव्हेंबर** : देव मिशन क्षेत्रांतील आमच्या मिशनरीचे रक्षण करीत आहे.

**२९ नोव्हेंबर** : आमच्या सर्व समन्वयकांकरिता देवाची स्तुती करु या.

**३० नोव्हेंबर** : देव सर्व दुष्ट शक्तिंपासून आमचे वरिष्ट पाळक पास्टर सॅम आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण करीत आहे.

**०१ डिसेंबर** : मागील महिन्यांतील आमचे सर्व कार्यक्रम देवाने आशीर्वादीत केले.

**०२ डिसेंबर** : या वर्षभरात अधिक छापील साहित्य तयार करण्यात देवाने आमची मदत केली.

**०३ डिसेंबर** : देवाने बहिण जेसी वीणा सॅम हिच्या प्रकृतीत सुधारणा केली आहे.

## प्रार्थने करीता मुद्दे

**०४ डिसेंबर** : देवाने या महिन्यातील सर्व सेवाकार्यातील आर्थिक गरजा पुरवाव्यात.

**०५ डिसेंबर** : देवाने लोकांमध्ये त्याच्या विषयीचे भय निर्माण करावे.

**०६ डिसेंबर** : देवाने मंडळ्यांमधील चुकीची तत्वे दूर करावीत.

**०७ डिसेंबर** : देवाने जगात मोठ्या प्रमाणात संजीवन पाठवावे.

**०८ डिसेंबर** : जगभरातील सर्व नाश पावणाऱ्या लोकांच्या तारणाकरिता प्रार्थना करु या.

**०९ डिसेंबर** : **प्रतीदिनाचा स्वर्गीय मान्ना** जो प्रसिध्द करावयाचा आहे त्याकरिता प्रार्थना करु या.

**१० डिसेंबर** : पायाभूत शास्त्राभ्यास व थियॉलॉजीकल अभ्यास (पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेला) यासाठी प्रार्थना करा.

**११ डिसेंबर** : देवाच्या सर्व सेवकांच्या संरक्षणाकरिता प्रार्थना करु या.

**१२ डिसेंबर** : जगभरात सर्वत्र शांतता नांदावी यासाठी प्रार्थना करा.

**१३ डिसेंबर** : आमच्या सर्व प्रार्थना, आजीवन, विश्वासातील, महान सेवा कार्यातील भागीदारांकरिता व त्यांच्या कुटुंबाकरिता प्रार्थना करा.

**१४ डिसेंबर** : आमच्या सर्व मंडळ्यांच्या गरजा देवाने पुरवाव्यात.

**१५ डिसेंबर** : दूरदर्शन संचावर संदेश देणाऱ्या जगभरातील सर्व संदेशकारां करिता प्रार्थना करु या.

**१६ डिसेंबर** : देवाने आमच्या सेंट पॉलस् शाळेवर आशीर्वाद द्यावा.

**१७ डिसेंबर** : आमच्या सर्व सेवा गटांना देवाने सुरक्षित ठेवत रहावे यासाठी प्रार्थना करा.

**१८ डिसेंबर** : देवाने त्याच्या सर्व लेकरांना दैहिक आणि आत्मिकरित्या आशीर्वाद द्यावा.

## महान सेवा कार्य भागीदारांची - कार्य केंद्रे

● **केरळ**-त्रिवेंद्रम, कोट्याम, थीरूवेल्ला, एर्नाकुलम ● **तामिळनाडू**-त्रिची, कोईम्बतूर, मदुराई, नागरकोईल, असारी पाल्लम, सेलम ● **पंजाब**-लुधीयाना ● **मध्यप्रदेश**-भोपाळ ● **जम्मू-काश्मीर**-उधामणूर ● **उत्तर प्रदेश**-लखनऊ ● **गुजराथ**-अहमदाबाद ● **बिहार**-झारखंड ● **पश्चिमबंगाल**-कोलकत्ता ● **नागालॅण्ड ओरिसा**-नयागड ● **आंध्रप्रदेश**-विशाखापट्टनम ● **महाराष्ट्र**-मुंबई ● **पॉण्डेचरी** ● **पाकिस्तान** ● **श्रीलंका** ● **बांगलादेश** ● **नेपाळ**

*(पान ४ वरून .....)*

ख्रिस्तविरोधकाला अनुसरण्यास कदापी फसविला जाणार नाही". परंतु पौल म्हणतो ख्रिस्त विरोधक सत्तेत - अधिकारावर येईल कारण लोक त्यांच्याच पापामुळे आंधळे बनतील आणि फसविले जातील. "ज्यांचा नाश होणार त्यांनी आपले तारण साधावे म्हणून सत्याची आवड धरिली नाही, त्यांच्यासाठी सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हें, अभ्दूते असे त्यांचे येणे होईल." (२ थेस्सलनी २:९-१०).

सैतान असंख्य लोकांना सहजपणे समजू शकणार नाही अशा परंतु खोट्या - लबाडी द्वारे फसविल. त्याची लबाडी काय असणार ? हवेला जशी खात्री करुन दिली. त्याचप्रमाणे संपूर्ण जगाला खात्री करुन दिली........"देव पापाबद्दल शिक्षा करीत नाही".

पौल म्हणतो हि लबाडी येणार "ती सर्वप्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हें, अभ्दुते.... यांनी युक्त असे त्याचे येणे होईल. पुढे तो म्हणतो. त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा एतदर्थ देव त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य चालेल असे करितो".

प्रेषित पौल असे म्हणत आहे, "जे आज्ञा पालन नाकारतील किंवा देवाच्या वचनांचा सन्मान करणार नाहीत ते सर्व फार मोठ्या भ्रांतित पडतील. सुरुवातीस ते त्यांच्या पापाला डोळे मिचकावतील. त्याचे ते समर्थन करतील. परंतु लवकरच सक्रीयतेने सहज - सोप्या कृपेचा शोध लावतील. ते अशा कृपेचा शोध लावतील की जी देवाने इच्छीलेल्या कृपेच्या फारच दुरची असेल. देवाची कृपा परवाना देत नाही तर पश्चातापाकडे वळविते".

## सध्या जग हे घोर अशा संभ्रमाखाली आहे.

सध्या जग हे सैतानाच्या फसवणुकीच्या मोहक - आकर्षित करणाऱ्या शक्तिच्या दडपणा खाली आहे. तरी देखील मी अधिक काही बोलण्याच्या आधी, हे समजुन घ्या, की मी एक समतावादी किंवा प्रजासत्ताकवादी या नात्याने बोलत नाही. मला जे काही बोलावयाचे आहे त्याचा राजकारणाशी मुळीच संबंध नाही - तर ते आत्मिक सत्याशी निगडीत आहे. सत्य हे आहे की, आपल्या देशाच्या पुढाऱ्यांनी देवाच्या वचनाला - शब्दाला पुर्णपणे बाजूला टाकून दिले आहे. बायबल मधील सत्याविषयी त्यांना अजिबात मान नाही आणि देवाने आता आपणावर, फसवणूक किंवा लबाडी येवू देण्यास परवानगी दिली आहे.

आज सैतानी लबाडी जगाला खोट्या शांतीचे आच्छादन - पांघरुण घालीत आहे. त्या मागील कल्पना अशी आहे की, आपण परिणामांची भीती न बाळगता मनाला वाटेल तसे वागू शकतो - हवे ते करु शकतो. आपण या लबाडीची मर्यादा अगोदरच ओलांडलेली आहे आणि आता न्याय अटळ आहे.

पौल रोमकरांस लिहिलेल्या पत्राच्या १ल्या अध्यायात या दैवी न्यायविषयी लिहितो. तो त्यांच्या विषयी लिहितो ज्यांनी बायबलमधील सत्ये स्विकारली होती व ते त्यांना धरून होते परंतु नंतर ती सत्ये अप्रामाणिकपणे धरून राहिले होते. थोडक्यात, त्यांना देवाची वचने आणि त्यांची वासना दोन्ही एकाच वेळी हवी होती. त्यामुळे देवाने त्यांना भ्रष्ट अशा मनाच्या स्वाधीन केले. त्यांना लबाडी - असत्यावर विश्वास ठेवावयाचा होता - त्यामुळे देवाने त्यांना फार मोठ्या भ्रांतित टाकले.

आता ही प्रवृत्ती मंडळ्यांमध्ये शिरली आहे. असंख्य ख्रिस्तीजन आज बीभस्त चित्रपट पहात आहेत. एक वेळ अशी होती की त्यांची सद्सद्विवेक त्यांना आवरुन धरीत असे. परंतु आता ते अशी सबब देतात. "आमचे सर्व पुढारी त्यामध्ये गुंतलेले आहेत, सर्वजण ते करीत आहेत". मग मीच ते का करु नये ? ते सैतानाच्या लबाडीला बळी पडले आहेत.

पौल चेतावणी देत आहे, "कारण ते सुशिक्षण सहन करणार नाहीत, तर त्यांचे कान खाजत असता, ते स्वेच्छाचाराने आपणांसाठी शिक्षकांची रास घालतील आणि ते सत्य ऐकतनासे होतील, व कहाण्यांकडे वळतील, अशी वेळ येईल". (२ तीमथी ४:३-४)

पौल अशा कोणत्या फसविल्या गेलेल्या समुद्रायाबद्दल बोलत आहे ? ते फसविले गेलेले ख्रिस्तीजन होत ! त्याने थेस्सलनीकांतील मंडळीला हे पत्र लिहिले होते - नवा जन्म पावलेले विश्वासी जन ! जे बायबलचे शिक्षण घेतले होते आणि त्यांना देवाचे सत्य कळले होते. तरी देखील अमंगळ कृत्यांना धरून होते आणि आता त्यांना त्यांच्या पापात समाधान असे पाखंडी - विरोधी मत स्विकारले होते.

## जो आनंदाने देवाचे वचन ऐकतो - परंतु वचनाचे पालन करीत नाही तो विश्वासणारा फसविला जाण्याच्या मोठ्या धोक्यात आहे.

पौल गलतीकरांच्या मंडळीस लिहितो, "तुम्ही चांगले धावत होता, तर सत्याला मान्य होऊ नये असा तुम्हांस कोणी अडथळा केला?" (गलती ५:७). "येशू ख्रिस्ताला ज्या तुमच्या डोळ्यांपुढे वर्णन करुन ठेविले होते त्या तुम्हांस कोणी भुरळ घातली ?" (गलती ३:१). पौल त्याच्या कळपाला विचारीत होता, "तुम्हाला काय झाले ? तुम्ही चांगले करीत होता, परंतु आता तुम्हाला भुरळ घातली गेली आहे".

संपूर्ण पवित्र शास्त्रात आपणांस देवाने त्याच्या वचनांचे पालन करणे किती महत्वाचे आहे याविषयी स्पष्ट रितीने सांगितले आहे. शौल राजाच्या जीवनात या संबंधीचे एक उदाहरण आपल्याला पहावयास मिळते. शमुवेल संदेष्टयाच्या द्वारे देवाने शौलाला स्पष्ट आज्ञा दिली होती. त्याने शौलाला ताकीद दिली. "आता जाऊन अमालेकास मार दे, त्यांच्या सर्वस्वाचा विध्वंस कर, त्यांची गय करु नको, पुरुष, स्त्रिया, अर्भके, तान्ही बाळे, बैल, मेंढरे, उंट आणि गाढवे या सर्वांचा संहार कर" (१ शमुवेल १५:३).

शौलाने या आज्ञेचे पालन केले काय ? शास्त्रवचन असे सांगते "..... शौलाने ..... अमालेक्यास मार देत नेले. त्याने अमालेक्याचा राजा अगाग याला जीवंत पकडिले..... शौलाने व लोकांनी आगागगाला जीवंत राखिले, त्याचप्रमाणे उत्तम मेंढरे, बैल, पुष्ट पशु, कोकरें आणि जे जे काही चांगले होते ते त्यांनी राखून ठेविले, त्यांचा अगदी नाश करावा असे त्यांस वाटले नाही....." (१ शमुवेल १५:७-९).

देवाने शौलाला अगदी स्पष्टपणे हातात तलवार घेण्यास सांगितले होते. तरी देखील युध्दावर गेल्यानंतर त्याने देवाच्या आज्ञेचे अर्धवट पालन केले. त्यांच्या सर्वस्वाचा नाश न करता त्याने अमालेक्यांचा राजा अगाग याला जीवंत

राखीले आणि युध्दातील लुटीतील चांगले ते राखीले.

शमुवेल यामुळे अतीशय दु:खीत झाला, आणि शौलास म्हणाला, “परमेश्वराने तुला मोहिमेवर पाठवून सांगितले की जा, त्या पापिष्ठ अमालेक्यांचा सर्वस्वी संहार कर आणि ते नष्ट होत तोपर्यंत त्याजशी युध्द कर, असे असता तू परमेश्वराचा शब्द का ऐकला नाही ? तू लुटीवर झडप घालून परमेश्वराच्या दृष्टिने जे वाईट ते का केले ?”(वचन १८-१९).

या प्रसंगी देवाच्या वचनात दु:खाचे जळजळीत शब्द वाचावयास मिळतात. “मग शमुवेलास परमेश्वराचे वचन प्राप्त झाले की, मी शौलास राजा केले. याचा मला पस्तावा होत आहे, कारण मला अनुसरण्याचे सोडून देऊन त्याने माझ्या आज्ञा पाळिल्या नाहीत” (वचन १०-११).

हि स्थिती तुमच्या जीवनाचे वर्णन करीत आहे का ? देवाने तुम्हाला कोणत्या हि अनिश्चित समयात तुमच्या जीवनातील निश्चित स्वरुपात असलेल्या वासनेच्या सवयी सोडून देण्याविषयी सांगितले आणि अजूनपर्यंत तुम्ही तिला बिलगून आहात, ती सोडून देण्यास नकार देत आहात?

या क्षणाला, त्याचा आत्मा तुमच्याशी मृदु, प्रेमळ आवाजात बोलत असेल, “तुझी वासना आपल्या मध्ये येत आहे आणि जीवलग संबंधात बाधा आणीत आहे, तू तिला चिटकून - बिलगून राहिलास तर मी तुला आशीर्वाद देऊ शकत नाही. तुझ्या मदतीकरिता माझ्या आत्म्यावर भरोसा कर. माझ्या लेकरा सोडून दे ती वासना - ती सवय”. परंतु तसे न केल्यास देव रागाने तुला बोलेल, “तुझी वासना सोडून देणार नाहीस, तर मी तुला लोकांसमोर उघडे पाडीन - लोकांमध्ये मी दाखवून देईल - मग त्यामुळे तुझे जीवन उध्वस्त होईल”.

शौलाने आज्ञा न पाळल्यामुळे देवाने त्याला नाकारीले. नापसंद केले. शमुवेलाने शौलास म्हटले, “अवज्ञा जादुगीराच्या पातकासमान आहे, आणि हट्ट हा मूर्तिपूजा व कुलदेवतार्चन या सारखा आहे, तू परमेश्वराचा शब्द मोडिला आहे म्हणून त्यानेही तुला राजपदावरुन झुगारुन दिले आहे” (१ शमुवेल १५:२३).

त्याच वेळेस देवाचा आत्मा शौलास सोडून गेला. शौलाने अर्धवट आज्ञापालनामुळे सैतानाच्या प्रभावासाठी तयार झाला. लवकरच दुष्ट आत्मा शौलाला त्रास देवू लागला आणि परिणामी चेटकीणीचा सल्ला घेण्यापर्यंत त्याची मजल गेली. शौलाच्या जीवनाचा आढावा वाचल्या नंतर तुम्ही कदाचीत विचार कराल, “शौलाने सर्वतोपरी उत्तम प्रयत्न केले. आणि त्याने वाईट उद्देशाने ते केले नाही. मग देव त्याजवर इतका का क्रोधीत झाला ? त्याने शौलाला का क्षमा केली नाही ?”

देव या परिच्छेदाद्वारे आम्हांस सांगत आहे की, मी जे बोलतो ते मनापासून बोलतो. ते मला कळते. तो म्हणतो तुझ्या आज्ञापालना बद्दल मला कसे वाटत आहे ते दाखवत आहे. मला तुझे संपूर्ण हृदय - तुझे संपूर्ण प्रेम हवे आहे - केवळ अर्धवट मनाने केलेले आज्ञापालन नको आहे. देवाने शौलाला अस्पष्ट असा संदेश - निरोप दिला असता तर मात्र आपण म्हणू शकलो असतो कि देवाने त्याला काही प्रमाणात सूट द्यावयास हवी होती. परंतु देवाने त्याला अगदी स्पष्ट अशी दिशा दाखविली होती. - स्पष्ट सुचना केली होती. त्याने दिलेल्या आज्ञेत संशय व्यक्त करण्यास जागा नव्हती. तव्दतच आज, देव जे आपणाशी बोलला आहे त्या बद्दल आपल्याला संशय नाही. त्याच्या आज्ञा काय आहेत ते आपल्याला ठाऊक आहे कारण त्याने त्याच्या वचनांच्या द्वारे आणि आपल्या अंत:करणात त्याच्या आत्म्याच्या द्वारे त्या आपल्याला प्रकट केल्या आहेत.

तुम्ही कदाचीत म्हणाल, परंतु शौलाच्या बाबतीत जे घडले ते जुन्या करारात, नियम शास्त्राच्या खाली, आपण आता कृपेच्या काळात आहोत. निश्चितपणे देव जसा शौलाशी निष्ठूरपणे वागला तसा आपण आज्ञापालन केले नाही तर आपल्याशी वर्तणार नाही”.

या संबंधात नव्या करारा अंतर्गत कृपेच्या करारा अंतर्गत देवाचे वचन पहा. “तो प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे फळ देईल, धीराने सत्कर्म करीत राहून जे गौरव, सन्मान व अविनाशिता यासाठी खटपट करितात त्यांस तो सार्वकालिक जीवन देईल, परंतु जे तट पाडणारे व सत्याला न मानिता अर्धमाला मानितात, त्याजवर क्रोध व कोप, संकट व क्लेश ही येतील, म्हणजे दुष्कर्म करणारा मनुष्य, प्रथम यहूदी आणि मग हेल्लेणी अशा प्रत्येकाच्या जीवावर ती येतील”. पण प्रत्येक सत्कर्म करणारा प्रथम यहूदी आणि मग हेल्लेणी, त्यांस गौरव, सन्मान व शांती ही मिळतील. कारण देवाजवळ पक्षपात नाही” (रोम २:६-११).

मला तुम्हाला जुन्या करारातील शौल आणि नव्या करारातील सर्व विश्वासणारे यामधील फरक सांगू द्या :- एकाद्या व्यक्तिला खऱ्या मनाने देवाच्या आज्ञा पाळण्याची इच्छा असते - ती व्यक्ति जेव्हा देवाच्या वचनांवर प्रीती करीते आणि सन्मान करीते - पवित्र आत्मा त्याला त्या आज्ञा पाळण्यास सामर्थ्य आणि पात्रता पुरवितो. हीच नव्या करारातील तरतूद.

शौलाला अशा प्रकारची इच्छा नव्हती. परंतु कोणीही विश्वासणारा जो खऱ्या अंत:करणाने देवावर आणि त्याच्या वचनांवर प्रीती करतो तो वासनेवर मात करु शकतो, त्याजमध्ये वास

## बातमी :

### “बाहेर या..... आम्ही तुम्हाला जाळू”

अंबाला, हरीयाना:- या ठीकाणी असेब्लीज ऑफ गॉडचे ३२ वार्षिय पाळक, अविनाश कालरा यांच्यावर अतिरेक्यांनी मुर्त्या भ्रष्ट केल्याचा आणि जबरी धर्मांतर केल्याचा आरोप करुन त्यांना आणि कुटुंबाला घर सोडून पळून जाण्यासाठी जबरदस्ती केली. ११ जुलै रोजी २०० लोकांचा जमाव त्यांच्या घरासमोर आणि मंदिराच्या समोर जमा झाला आणि “बाहेर या, आम्ही तुला सोडणार नाही, तुला जाळून टाकू” अशा गर्जना करु लागला. स्थानिक पोलीसांनी चौकशीचा आदेश दिला आहे. १०० सभासद असलेले हे प्रार्थना मंदिर २०१४ सालात सुरु झाले. जुलै १९ रोजी अंबालाच्या रस्त्यावरुन जवळ-जवळ ३०० ख्रिस्तीजनांनी प्रार्थना मंदिरावरील हल्ल्याचा आणि भारतात होणाऱ्या अल्पसंख्यांकावरील दडपशाहीचा/छळाचा निशेध व्यक्त केला - एम.एस.एन. - फोररनर (ऑक्टोबर २०१८)

करणाऱ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने पापाची सत्ता मोडून टाकू शकतो.

पौल विश्वासणाऱ्यांना कडक शब्दात ही ताकीद देतो, "हे मानवा, जो तू तशी कर्मे आचरणाऱ्यांचा न्यायनिवाडा करीत असून तीच स्वत: करितोस तो तू देवाचा न्याय चुकविशील असे तुला वाटते काय ?" (रोम २:३). तो असे म्हणत आहे, "तू अशी साक्ष देत आहेस की सर्वांनी नियमांचे पालन करा असे सांगणारा ख्रिस्ती तू आहेस, आणि तू स्वत: व्यभिचारामध्ये आहेस ?"

"देवाची दया तुला पश्चाताम करावयास लावणारी आहे. हे न समजता, त्याचे दयालुत्व, क्षमा व सहनशीलता ही विपुल असल्यामुळे त्याचा अवमान करितोस काय ?" (रोम २:४) पौल आणखीन (वचन तीन नंतर) पुढे बोलत आहे, "देव आतापर्यंत तुम्हा सर्वांशी दयाळूपणे वर्तला आहे, राहिला आहे, तुम्हांशी दयाळूपणे आणि प्रीतिने वर्तला आहे. त्यांचे सर्व चांगुलपण, दयाळूपण आणि कृपा तुम्हांला पश्चाताप करण्यास लावणारी आहे. हे तुम्हांला समजत नाही का ?"

## या संदेशाचा अर्थ काय आहे ?

इतर सर्वांपेक्षा मला तुम्हाला हे सांगावयाचे आहे:- ख्रिस्त विरोधी एक महान असा उत्कर्ष - भरभराटीचा संदेश देणारा उपदेशक अशा स्वरुपात लवकरच प्रकट होणार आहे. सैतान आतापासूनच अर्धवट मनाच्या विश्वासणाऱ्यांना उचलीत आहे. थोड्याच समयात आपल्या समाजावर काही बंधन नसणार आणि ख्रिस्तीजन सैतानी फसवणूकीला कधी नव्हते एवढे बळी पडणार आहेत.

हिटलरच्या काळात अनेक जर्मन ख्रिस्ती लोकांच्या बाबतीत हे घडले होते. हिटलर जेव्हा एक आकर्षीत करणारे व्यक्तिमत्वाच्या रुपात सत्तेवर आला आणि चांगले जीवन देण्याचे आश्वासन दिले. तेव्हा अनेक कोमट स्थितीतील लूथरन आणि पेन्टेकॉस्ट लोकांनी त्याचा स्विकार केला. आणि समाजावर त्याचे दुष्टपण लादण्यास सुरुवात केली, तेव्हा हेच लोक उलट मार्गाने पाहू लागले, देवाच्या वचनाचे सत्य नाकारु लागले. अर्थात त्या दिवसात देखील सुवार्तेच्या बाजूने आवाज उठविण्यास मंडळ्यात लोक पुढे आले. परंतु खेदाची गोष्ट मोठ्या प्रमाणात विश्वासणारे त्याला अनुसरण्यास, त्याची स्तुस्ती करण्यास, जयजयकार करण्यास तयार झाले. त्यांनी लबाडी आणली आणि देवाने त्यांना फार मोठ्या प्रमाणात संभ्रमात टाकले.

मी तुम्हाला विचारतो:- तुम्ही तुमचे पाप उघड करणाऱ्या संदेश ऐकण्यास आनंदाने बसता का ? जर होय - तर मग त्या संदेशाला तुमची खात्री पटवू देता का ? किंवा दु:ख न करीता परत त्याच वासनेत माघारे जाता का ?

तुम्हास मागे धरुन ठेवणाऱ्या पवित्र आत्म्याला जर तुम्ही नकार देता - किंचीतही दु:ख प्रकट न करता दिवसांमागे दिवस देवाची अवज्ञा करीत आहा - तर तुम्ही त्या ख्रिस्त विरोधाच्या गटात भरती केले जात आहात. सैतान तुम्हाला न कळत त्याच्या घोर अन्यायाच्या गुजाकडे वळवत आहे आणि जेव्हा आश्वासन देणारा, चमत्कार घडविणारा ख्रिस्ताविरोधी येईल, तुम्ही त्याच्या लबाडीत झोडपले जाऊन संभ्रमाच्या हवाली करण्यात येईल.

तडजोड किंवा समझौता करणारे विश्वासणारे जे देवाच्या पवित्र वचनावर प्रेम करण्यास आणि ती पाळण्यास नकार देणाऱ्यांजवळ पौल काय बोलत आहे पहा:- "ज्यांनी असत्यावर विश्वास ठेविला नाही, तर अनीतीत संतोष मानीला त्या सर्वांस दंडाज्ञा व्हावी म्हणून असे होईल" (२ थेस्सल २:१२) ज्यांना स्वत:च्या वासनांविषयीचे सत्य माहित आहे, परंतु देव त्याबद्दल त्यांचा न्याय करणार यावर विश्वास ठेवित नाही त्यांना धिक्कार असो.

देवाच्या वचनावर विश्वास न ठेवण्याचे आणि कृति न करण्याच्या अनिष्टतेचे असे परिणाम आहेत :-

(१) पापाच्या फसव्या/दगाबाजपणामुळे अंत:करण कठीण होऊन जाते.

(२) सैतान त्या कठीण अंत:करणाचे समर्थन करण्याकरिता त्यावर कार्य करतो यासाठी की ते शिक्षेच्या भयापासून मुक्त व्हावे.

(३) या हृदयाकडे देव पहातो आणि त्याला कळते की आता हे हृदय सत्य स्विकारण्याची आणि पाळण्याची अजिबात शक्यता नाही, तेव्हा देव त्या व्यक्तिस सैतानी भ्रांतीच्या स्वाधीन करतो.

(४) पापासाठी वेतन नाही आणि न्यायाचा दिवस नाही, आणि तो त्याच्या वासनेच्या सुरवात राहू शकतो अशा या लबाडीने विश्वासणाऱ्यांचे डोळे आंधळे बनतात.

(५) विश्वासणारा पिशाच्छांचा बळी ठरतो आणि जे वाईट ते चांगले आहे व जे चांगले ते वाईट आहे असा विचार करु लागतो.

(६) सरतेशेवटी तो ख्रिस्तापासून आणि सत्यापासून इतका दूर जातो, की तो ख्रिस्तविरोध्याला अंधळा बनतो व त्याची देव म्हणून त्याची उपासना आणि सेवा करु लागतो.

(७) न्यायाच्या दिवशी, देव अशा व्यक्तिला म्हणेन, "अनितीची कृत्ये करणाऱ्या मजपुढून निघून जा".

प्रियांनो, आपल्यापैकी कोणाचा देखील हा मार्ग असू नये. देवाने ख्रिस्ताच्या क्रुसाच्या सामर्थ्याद्वारे सर्व प्रकारची लबाडी आपल्यापासून दूर करण्याची आणि आपल्याला पापावर विजय देण्याचा करार केलेला आहे. तो आमच्या पासून एकच अपेक्षा करतो की आपण असे म्हणुन आपल्या पापाविरुध्द युध्द पुकारावे "मी या सवयीशी समझौता करणार नाही. त्यामध्ये राहाण्यास मी नकार देतो. पित्या मला तुझ्या आत्म्याच्याद्वारे मुक्त कर. तो जेव्हा ही प्रार्थना ऐकेल तो पवित्र आत्म्याचे असे सामर्थ्य पाठविल की ज्यापुढे सैतानाला कुठलीच संधी मिळणार नाही".

आता, या क्षणी प्रार्थना करा की देवाने तुम्हामध्ये त्याच्या वचनांबद्दल आदरयुक्त भय घालावे. त्याचे वचन वाचण्याची शिस्त - सवय तुम्हाला लागावी असे त्याज जवळ मागा. पवित्र आत्म्याला मागा की जे वाचता ते आत्मसात करण्याकरिता आणि देव बोलतो. त्यामध्ये अर्थ आहे. यावर विश्वास ठेवण्यास त्याने तुम्हांस मदत करावी.

**- रेव्ह. डेविड विलकरसन.**


**Echo of His Call Advertisment Rates**

| Size | One Language Only | In All 16 Languages |
|---|---|---|
| Quarter Page | Rs. 2,000 | Rs. 30,000 |
| Half Page | Rs. 3,500 | Rs. 50,000 |
| Full Page | Rs. 5,000 | Rs. 70,000 |



# PIT TO PALACE
# खड्यातून महालापर्यंतची मालिका

**(रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)**

**“जो कोणी बुध्दिमान् असेल त्याने ह्या गोष्टींकडे लक्ष पुरवावे” (स्तोत्र १०७:४३(अ))**

**“परमेश्वराचे नेत्र धार्मिकाकडे असतात, त्याचे कान त्यांच्या हाकेकडे असतात”**

(स्तोत्र ३४:१५)

आज माझ्या सकाळच्या प्रार्थनेच्या समयात देवाने मला माझ्या सुरुवार्ताच्या सेवा काळातील विचार आणले आणि त्यावेळी त्याने अगदी अचूकपणे माझे कसे मार्गदर्शन केले ते दाखवून दिले.

देवाच्या अचूक मार्गदर्शना बद्दल स्पष्टीकरण देण्याकरिता मी माझे एक मित्र पी. शीवप्रकासम यांनी मला पाठविलेले पत्र प्रसिध्द करीत आहे.

प्रिय बंधु सॅम सेल्वा राज,

मला तुझ्या सर्व कार्याबद्दल पुष्कळ दिवसांपासून तुला लिहून कळविण्याची इच्छा होती. या वेळी लवकरच तू तुझ्या सेवेचे आणि एको ऑफ हिज कॉल मासिकाचे सुवर्ण वर्ष साजरे करणार आहेस, मी तुझ्या सेवेबद्दल माझ्या हृदयात असलेले विचार प्रकट करण्यासाठी ही उत्तम संधी आहे असे समजतो.

सर्व प्रथम तुला “एको ऑफ हिज कॉल” चा संस्थापक आणि प्रमुख संपादक या नात्याने शुभेच्छा व्यक्त करितो. तू वेगवेगळ्या अडचणींना आणि आवाहानांना यशस्वीपणे पार करुन २०१९ या सुवर्ण वर्षात पदार्पण केले आहेस. सोबतच सर्व प्रशासक आणि कामकरी ज्या सर्वांनी अतिशय श्रम केले, त्या सर्वांचे देखील हार्दिक अभिनंदन करीत आहे.

तुझा जन्म जरी कन्याकुमारी जिल्ह्यातील एका छोट्या गावांत झाला आणि कम्युनिस्ट विचारसरणीत वाढलास, तरी देखील तू देवाच्या सेवेत मागील ५० वर्षांमध्ये वेगवेगळ्या अडचणी, अडखळणे, उपहास या सर्वांवर मात केलीस. तुझ्या चिकाटीमुळे आणि सहनशीलतेमुळे तू त्या सर्व हालअपेष्ठांना बाजूला ढकलून दिले आणि आज तू अगदी योग्य प्रकारे प्रतिफल उपभोगीत आहे हे कोणीही नाकारु शकत नाही.

आपण दोघे शासकीय कार्यालयात एकत्र काम करीत होतो त्या दिवसांकडे मागे वळून पाहात आणि आश्चर्य वाटते की आता त्याला ४० वर्षे लोटली आहेत. तू एको ऑफ हिज कॉल मासिकाच्या माध्यमातून त्या दिवसांपासूनचे तुझे सर्व गोड आणि कडू अनुभव “खड्यातून महालापर्यंत”च्या शिर्षकाखाली लिहित आला आहेस. ते सर्व अनुभव खरे होते आणि त्यांनी तुझ्या जीवनात पुष्कळशी भर घातली.

तुझ्या अथक परिश्रम, तीव्र भावना, निर्धार आणि अटल दृढविश्वास या सर्वांमुळे तू उच्च स्थानात पोहंचला आहेस हे पाहून मी आनंदाने भारावून गेलो आहे.

तू कोणाशीही स्पर्धा केली नाहीस आणि ही शर्यत अतिशय वेगाने धावला नाहीस. शर्यतीत भाग घेण्याकरिता तुला कोणी तुझ्या इच्छेविरुध्द ढकलले नाही. तू स्वत:हूनच धावण्यास सुरुवात केली. मला ठाऊक आहे की, ही संस्था स्थिर उभी करण्याकरिता तू सर्व दिशांमध्ये धावलास. अनेक अडखळणे, बरे-वाईट संबंध मोडून काढले, निराशा कडवटपणा, आरोप यांना सामोरा गेलास, आणि सरतेशेवटी आता या विजयी उद्दीष्टा पर्यंत पोहंचला मी हे शिकलो आहे की, आपल्याला इतरांकडून बरेच सल्ले मिळतात. परंतु आपला निर्णय हाच उत्तम ठरतो. मला हे मोल्यवान सत्य तू स्वच्छ मनाने घेतलेल्या निर्णयाद्वारे पहावयास मिळाले. “आजचे काम आजच पूर्ण करावे आणि उद्यासाठीचे काम आजच योजून ठेवावे” तुझे हे धोरणच तू काय आहेस हे सिध्द होते. माझ्या हे पाहण्यात आले आहे. की जे सभ्य आणि आदर करणारे त्यांच्या बरोबर तू सभ्यपणे आणि आदरपूर्वक वागतोस आणि जे राकट - न ऐकणारे त्याच्या बरोबर कडकपणे वागतोस. हे सर्व गुण हेच प्रदर्शित करतात की तू एक उत्तम प्रशासक आणि नेतृत्वाचे गुण असलेली व्यक्ति आहेस.

शासकीय सेवेत असताना पुष्कळशा उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी आणि सामान्य कामगारांनी तुझ्या प्रती चांगुलपणा व्यक्त केला. वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये तू त्यांना मदत केलीस. तू मला सांगितले होते की त्यापैकी अनेकजण तुझ्यावरील कठीण प्रसंगात तुझ्या बाजूने उभे राहिले व तुला आधार दिला आणि अडखळणे दूर करण्यात मदत केली. तुझी त्यांच्या प्रती असलेली कृतज्ञता तुझ्या हृदयातील कृतज्ञता आणि औदार्य प्रकट करतात. शासनाने देखील तुला विशेष परवानग्या देऊन सन्मानित केले.

तुझ्या प्रार्थना सभा आणि विविध सेवेचे निरिक्षण करीत असताना मला दिसते की अनेक लोक त्यांच्या समस्या आणि व्याधींतून मुक्त होत आहेत, अनेकांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना प्राप्त होत आहे. तुझ्या सेवेमुळे समाजातील दुर्बळ - गरिब - घटकांना फार मदत होत आहे. त्यांना वैद्यकीय व शैक्षणिक मदत मिळत आहे आणि त्यामुळे त्यांच्या रहाणीमानात फरक पडत आहे. तुझ्या चेन्नईमधील सुरुवातीच्या दिवसात तू जर राजकीय पक्षाकडे वळला असता तर एका मोठ्या राजकीय पक्षात मोठा पुढारी झाला असतास. तुला देवाने पाचारण केल्यामुळे आणि त्याच्या द्वारे आशीर्वादीत केला गेला असल्यामुळे तू आत्मिकतेमध्ये मुळावला गेला आहेस.

आत्मिकता हि देवाची इच्छा आहे. आत्मिक शक्ति ही गौरवी आहे. हा जो तुझा विश्वास आहे तोच तुला प्रेरणादायक बल-शक्ति ठरला आहे. तुजमध्ये आत्मिक शक्ति भरली गेलेली असल्यामुळे तुझे सर्व विचार आणि भविष्या विषयीच्या तुझ्या उद्दीष्टांना फार मोठ्या प्रमाणात यश प्राप्त होत आहे. हे सर्व मला तुझ्या जीवनशैलीचे निरीक्षण करीताना समजुन आले.

देवाने तुला अनाकलनीय असे शहाणपण आणि बल दिले आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या दु:खातून तू जात असतोस तेव्हा देव स्वत: तुझ्यासमोर येतो आणि त्यातून तुला मुक्त करतो. वैयक्तिक प्रतिकुल परिस्थितीतून जात असताना तुला उदात्त मनाने समजुन घेणारे कुटुंबिय देवाने दिलेत. देवाने तुला योग्यतेचे आणि वजनदार असे प्रशासक आणि काम करणारे पुरविलेत, यासाठी की तुझ्या सेवेतील कार्यक्रम, प्रसिध्दीकरण, बायबल कॉलेज आणि शाळा यापैकी कशालाही उतरती कळा लाभू नये.

**RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/18-20**

आपण "एको ऑफ हिज कॉल" चे सुवर्ण वर्ष साजरे करीत असताना जे सर्व प्रियजन आपले शुभेच्छुक आहेत त्यांचे स्मरण करीत आहे. आपले ऑस्ट्रेलीयातील मित्र हेडन ह्युटन आणि डॉ. बी. जे. कृष्णमुर्ती जे माझ्या विवाहात सामील झाले होते आणि आपल्याला शुभेच्छा दिल्या होत्या. मी ती घटना विसरु शकत नाही. त्याचप्रमाणे आपल्या बरोबर शासकीय सेवेत काम करीत होते ते मिस्टर सी. मुथ्थु, डी. के. इलूशा, रहेमान बाशा, बालकृष्णन, मुतुस्वामी, गजेंद्रन, जयनुल्लाबुद्दीन, प्रथमन राममुर्ती, थंगवेल, मिसेस पल्लवन्नम, मिसेस टी.व्ही. सावित्री, मिसेस जेयाकुमारी, मिसेस राजेश्वरी, मिसेस कृष्णवेनी, मिसेस रमीसा बीवी आणि इतर तुझ्या सेवेच्या सुरुवातीच्या काळातील सहकारी - मिस्टर डी. डब्ल्यू. देवकंदन, जे. आर. सुंदरराज, आर. इ. जयराज, जयकुमार महाराज, जी. जे. पौलमनी, डी. रीचर्ड थंबीराज, एन. शाम सुंदर आणि एम. पॉलराज.

विश्रांती न घेता जलद गतीने काम करणे तुझ्या करिता स्वाभाविक आहे. तरी देखील माझी नम्र विनंती आहे, की तुझी प्रकृती आणि कौटुंबिक परिस्थिती यामुळे तू तुझ्या कामाची गती थोडी कमी करावी आणि शांतपणे काम करावे.

चांगल्या व्यक्तिची मैत्री ही गोड असते अशी म्हण आहे. माझी एकच प्रार्थना आहे की आपल्या या मैत्रीचा पूल सदैव भक्कम रहावा.

मी "एको ऑफ हिज कॉल" मासिक सतत प्रसिध्द होत रहावे अशी शुभेच्छा व्यक्त करतो. तुझे आत्मचरित्र देखील यशस्वीरित्या प्रसिध्द व्हावे अशी देखील इच्छा व्यक्त करतो.

१७-०९-२०१८ सर्वदासाठी तुझा मित्र
चेन्नई - १६ पी. शीवप्रकासम

प्रिय वाचकहो, हा लांबलचक संदेश वाचल्या बद्दल आभारी आहे. सर्व मान महिमा आणि गौरव आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताला. **"जो सनातन राजा अविनाशी, अदुष्य असा एकच देव, त्याला सन्मान व गौरव युगानुयग असो. आमेन"** (१ तिमथी १:१७).

- एस. सॅम सेल्वा राज

❖❖❖

**आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या करीता कृपया प्रार्थना करा :-**

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **बायबलकोर** - पत्रव्यवहाराद्वारे बायबल अभ्यासक्रम : इंग्रजी, तामीळ, हिन्दी
३. **एको ऑफ हिज कॉल** - मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नडा, मराठी, गुजराती, बंगाली, उडीया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज : (दोन केंद्रे)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान सेवा भागीदार (नेटवर्क ऑफ पास्टरस)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. धर्मसभा
९. हस्तपत्रिका वितरण आणि मागोवा (पाठपुरावा)
१०. शुभवर्तमान साहित्य छापण्याचा मुद्रणालय
११. सेंट पॉलस् मॅट्रिक्युलेशन स्कूल : गावातील इंग्रजी शाळा
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३०वा. आणि सायं. ४ वा.
१३. **तामिळ उपासना** : ५.३० वा. पहाटे, ७ वा. सकाळी आणि १० वा. सकाळी
१४. मल्यालम उपासना : रविवारी दुपारी ३ वा.
१५. तेलगू उपासना : रविवारी दुपारी ४ वा.
१६. हिन्दी उपासना : रविवारी सायंकाळी ५ वा.
१७. इंग्रजी/तामिळ उपासना : रविवारी सायंकाळी ६ वा.
१८. पाळकांचे समोपदेशन : रविवारी दुपारी ४ वा.
१९. स्त्रियांची प्रार्थना : बुधवारी सायंकाळी ५.३० वा.
२०. प. शास्त्राभ्यास : बुधवारी सायंकाळी ६.३० वा.
२१. पुरुषांची प्रार्थना : शुक्रवारी सायंकाळी ७ वा.
२२. कर्मचाऱ्यांची सभा : शनिवारी सांयकाळी ६ वा.
२३. गृह प्रार्थना सभा : सोमवार/मंगळवार सांयकाळी ६.३०वा.
२४. विशेष पवित्र सहभागीता : प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी पहाटे ५.३० वा.
२५. सेवकार्याचे सिंहावलोकन : पहिला शनिवार सांयकाळी ६.३०वा.
२६. पालकांची प्रार्थना : पहिला रविवार दुपारी ४ वा.
२७. रात्रीची प्रार्थना : दुसरा शुक्रवार रात्रौ ९.३० वा.
२८. उपवास प्रार्थना : पहिला शनिवार सकाळी ९.३० वा.
२९. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनांमध्ये
३०. सकाळचे मनन : दररोज पहाटे ५.३० वा.
३१. कर्मचारी मनन : दररोज सकाळी ९ वा.
३२. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ वा.(रविवार सोडून)

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/18-20**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th NOVEMBER 2018**
**If un-delivered please return to:**

**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**